# वसई-विरार शहर महानगरपालिका

## घनकचरा व्यवस्थापन विभाग

# जाहीर सुचना

## बल्क वेस्ट जनरेटर्स / घाऊक कचरा निर्माते - BWG

शहरातील नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना क्र. एस.ओ. ३८८ अ दि. २७/०७/२०२६ अन्वये संपूर्ण देशभरात दिनांक १ एप्रिल ०५/०५/२०२६ पासून **घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६** लागू करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने खालील कोणत्याही एका किंवा जास्त संकल्पनेत बसणाऱ्या सर्व आस्थापना (शासकीय व खाजगी कार्यालये, कंपन्या, औद्योगिक संस्था व क्षेत्र, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ व इतर शैक्षणिक संस्था, ५० पेक्षा जास्त सदनिका संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था, रेल्वे, बस स्थानके किंवा डेपो, विमानतळ, बंदरे यांसह व्यावसायिक आस्थापना, मॉल्स, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रुग्णालये, वृद्धाश्रम, वसतिगृहे, कृषी आणि फलोत्पादन उत्पादने, मासे आणि मांस यांच्यासाठी असलेल्या "मंडई" सह घाऊक बाजारपेठा, स्टेडियम, क्रीडा संकुल, सामुदायिक सभागृह, संमेलन सभागृह, प्रेक्षागृह, विवाह किंवा मेजवानी सभागृह, संमेलन केंद्रे, प्रदर्शन केंद्रे, प्रदर्शन क्षेत्रे, पर्यटन स्थळे इ.) या मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापना (BWG) असतील.

१. प्रतिदिन १०० किलो कचरा निर्माण करणाऱ्या कोणत्याही आस्थापना किंवा
२. २०,००० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रफळ असणाऱ्या आस्थापना किंवा
३. प्रतिदिन ४०,००० लिटर किंवा त्यापेक्षा जास्त पाण्याचा वापर करणाऱ्या आस्थापना.

**घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अन्वये तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाकडील दि. १९/०२/२०२६, दि. १९/०४/२०२६ व दि.०५/०५/२०२६ रोजीच्या आदेशान्वये BWG च्या जबाबदाऱ्या**
**Extended Bulk Waste Generator Responsibility (EBWGR)**
**खालीलप्रमाणे असतील**

**१** कचरा निर्मीतीच्या ठिकाणी घनकऱ्याचे चार (४) घटकांमध्ये वर्गिकरण करणे :

| ओला कचरा | सुका कचरा | सॅनिटरी कचरा | विशेष दक्षता घेणे योग्य कचरा |
|---|---|---|---|
| स्वयंपाक घरातील कचरा, अन्नाचा कचरा, भाजीपाला / फळे / फुलांचा कचरा, मांसाचा कचरा आणि इतर कोणताही तत्सम विघटनशील कचरा. | ओला कचरा, सॅनिटरी कचरा, विशेष काळजीचा कचरा वगळता इतर सर्व कचरा, ज्यामध्ये पुनर्वापर करण्यायोग्य कचरा (प्लास्टिक, कागद, धातू, काच इ.) आणि पुनर्वापर न करता येणारा कचरा यांचा समावेश आहे. | वापरलेले डायपर, सॅनिटरी नॅपकिन, टॅम्पॉन, कंडोम, इनकॉन्टिनन्स शीट्स (सुरक्षितपणे पॅक केलेले) आणि इतर कोणताही तत्सम कचरा. | वापरलेले रंगाचे डबे/ड्रम, किटकनाशकांचे डबे/भांडी/बाटल्या, फुटलेले पाऱ्याचे थर्मामीटर, टाकून दिलेले सीएफएल बल्ब/दिवे/ट्युबलाइट, बॅटरी, औषधे, वापरलेल्या सुया, सिरिंज इ. |

**२** १०० किलो किंवा त्या अधिक प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी (BWG) त्यांच्या आस्थापनेत निर्माण होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट आपल्या स्तरावर वैज्ञानिक पद्धतीने/ तंत्रज्ञानाद्वारे (कंपोस्टिंग, बायोमिथनायझेशन इ.) लावणे बंधनकारक आहे.

**३** सदर BWG आस्थापनांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**४** सदर यादी मधिल आस्थापनांपैकी ज्या आस्थापनांचा कचरा १०० किलोपेक्षा कमी निर्माण होत असल्यास अश्या आस्थापनांनी ३० दिवसांत स्वयंघोषणापत्र/ अर्ज (SELF DECLARATION) आपल्या जवळच्या घनकचरा व्यवस्थापन विभाग, प्रभाग समिती कार्यालय, येथे जमा करावयाचे आहे व असे न केल्यास सदर आस्थापनांना BWG असे घोषीत करण्यात येईल.

**५** केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या केंद्रीकृत पोर्टलवर (https://swm.cpcb.gov.in) नोंदणी करणे बंधनकारक आहे.

**६** BWG यांनी ओला कचरा व सुका प्रक्रिया प्रकल्प आपल्या प्रभाग समिती कार्यालयातील घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्रमाणित करून घेऊन तसे प्रमाणपत्र हस्तगत करून घेणे बंधनकारक आहे.

**७** घाऊक कचरा निर्मात्यांनी (BWG) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या (VVCMC) मान्यताप्राप्त (Empanelled) कचरा प्रक्रिया सेवा पुरवठादाराची निवड करावी. तथापि, महानगरपालिकेच्या पॅनेलबाहेरील अन्य कचरा प्रक्रिया सेवा पुरवठादाराची नियुक्ती करावयाची असल्यास, संबंधित सेवा पुरवठादार वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील.

## महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारी कार्यवाही

१ घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता करात ५% सवलत देण्यात येईल.

२ शहरातील सर्व BWG आस्थापनांचा कचरा मनपाच्या दैनंदिन कचरा वाहतुक करणाऱ्या वाहनांमध्ये घेतला जाणार नाही.

३ घाऊक कचरा निर्माते (BWG) यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधिल नमुद तरतुदीची अंमलबजावणी न केल्यास ३० दिवसानंतर प्रत्यक्षात मनपामार्फत दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

४ सर्व नागरिकांना/ आस्थापनांना पुनःश्च सूचित करण्यात येते की, मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी (BWG) यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अधिसूचनेचे पालन दि.३०/०८/२०२६ पर्यंत करणे अनिवार्य आहे.

**घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ , व BWG यादी करिता खालील लिंक तपासावी**

**( https://vvcmc.in/solid-waste-management-2/ )**

